

अरण येथे माजी खासदार समीर भुजबळ यांचा सत्कार करण्यात आला.

## भुजबळांकडून सावता महाराजांच्या संजीवन समाधीचे दर्शन

**माढा :** अखिल भारतीय समता परिषदेचे कार्याध्यक्ष तथा माजी खासदार समीर भुजबळ यांनी अरण येथील मंदि परिसराची पहाणी केली. त्याचबरोबर गाभारा ,तटभिंत विहीर, मंदिरालगतचा परिसर याची पाहाणी करुन राज्य सरकार राबवत असलेल्या विकास आराखड्यातील विविध विकासकामे तातडीने करण्याच्या दृष्टीने लक्ष घालणार असल्याचे सांगितले.

यावेळी संत सावता महाराजांचे वंशज तथा ट्रस्टचे अध्यक्ष सावता महाराज वसेकर ,रविकांत महाराज वसेकर, संतोष महाराज वसेकर, नितीन महाराज वसेकर, दादा महाराज वसेकर ,विठ्ठल महाराज वसेकर ,समता परिषदेचे आबासाहेब खारे ,माजी समाजकल्याण सभापती शिवाजीराजे कांबळे, नागेश राऊत, हरि गांवधरे, दिगंबर मामा माळी आदी उपस्थित होते.




छत्रपती शिवाजी महाराज चौकात जल्लोष करताना शिवभक्त.

## किल्ल्यांना युनेस्कोच्या यादीत स्थान; करमाळ्यात जल्लोष

**करमाळा :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्लयांचा नुकताच युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर करमाळा शहर व तालुका शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने रविवारी जल्लोष करण्यात आला.

रविवारी सायंकाळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पुतळ्याला छोट्या हिरकणीच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जिजाऊ वंदनेने या जल्लोषाला सुरुवात झाली. या किल्ल्यांच्या जागतिक वारसा म्हणून केलेल्या घोषणेची चित्रफीत डिजिटल स्क्रीनवर दाखविण्यात आली. याशिवाय हलगी आणि संबळच्या कडकडात आणि फटाक्यांची आतषबाजी करून छत्रपती शिवराय आणि जिजाऊंच्या जयजयकाराच्या घोषणा देत आनंद व्यक्त करण्यात आला. यानंतर शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला.




गुंड यांना राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार देताना शिवराजसिंह चौहान दिसत आहेत.

## शिवणी येथील गुंड यांना राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार

**उत्तर सोलापूर :** उत्तर तालुक्यातील प्रगतीशील शेतकरी रुकमंगत भारत गुंड यांना शेती व्यवसाय मध्ये विविध प्रयोग यशस्वी केल्याने फिक्की येथे झालेल्या मका परिषदेत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. रुकमंगत गुंड यांचे शिक्षण दहावी झाले आहे.कुटुंबात परंपरिक शेती मध्ये वडील, आई व तिघे भाऊ असून मधला भाऊ पुणे येथे नोकरीला आहे.

रुकमांगत व मोठा भाऊ यांना मिळून वडिलार्जित १५ एकर बागायत शेती आहे. यामध्ये ते ऊस, मका व कांदा पिके घेतात. त्यांनी मका पिकाचे सर्वात जास्त उत्पन्न एकरी २६ क्विंटल उत्पन्न घेतले. देशातील प्रत्येक शेतकऱ्यांनी पाण्याची बचत करून कमी वेळामध्ये जास्त उत्पादन घेता येतो यासाठी शेतकरी बंधूंना मार्गदर्शन देण्यासाठी सदैव तत्पर आहे, असे गुंड म्हणाले.

## महिलेच्या मृत्यूप्रकरणी टिप्पर चालकावर गुन्हा

**सोलापूर :** हायवा टिप्पर रिव्हर्स घेताना जनाबाई किसन रजपूत (वय ५० रा.शिवाजीनगर तांडा, केगाव ता.उत्तर सोलापूर) या महिलेच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गणेश गुलाबचंद जाधव (वय ४५ रा. तुळजापूर) याच्याविरुद्ध वळसंगच्या पोलिसांनी नुकताच गुन्हा दाखल केला आहे. हा अपघात ८ जुलै रोजी दुपारच्या सुमारास घडला होता.


यासंदर्भात मयत जनाबाई यांच्या वतीने किसन रजपूत यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. मंगळवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास वळसंग ते हणमगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथे रस्त्याचे काम चालू होते. त्यावेळी डांबर आणि खडीने भरलेला एमएच१३-डीक्यू-४%८८ या क्रमांकाचा टिप्पर रिव्हर्स घेत होता. तेंव्हा रस्त्यावर काम करणारे जनाबाई रजपूत या पाठीमागच्या चाका खाली सापडून गंभीर जखमी होऊन जागील मयत झाल्या होत्या.अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास हवालदार मालचे करीत आहेत.

# यात्रेनंतर पंढरपूरकर संसर्गजन्य आजारांनी त्रस्त

### होम टू होम आरोग्य यंत्रणा राबवण्याची मागणी

**पंढरपूर/प्रतिनिधी**

आषाढी यात्रा यंदा प्रथमच विक्रमी भरल्याचे पाहावयास मिळाले आहे. वारी सुखरुप व सुरक्षितपणे पार पडली असली तरी पंढरपूरकर नागरिक मात्र आजाराने त्रस्त झाले आहेत. सर्दी, खोकला, अंगदुखी, डोकेदुखीच्या रुग्णांनी दवाखाने हाऊसफुल्ल झाले आहेत.



आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर वाखरी पालखी तळ, मंदिर परिसर, चंद्रभागा वाळवंट, ६५ एकर भक्तीसागर परिसर, यासह पंढरपूर शहरात गर्दीच्या ठिकाणी आरोग्य विभागाकडून महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले. लाखो भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यात आली. याचबरोबर नगरपालिका प्रशासनाकडून पंढरपूर शहर हद्दीत स्वच्छतेला प्राधान्य दिले होते. मुबलक पाणी आणि तात्पुरत्या स्वरूपाची शौचालये उभारून दशमी दिवशी तातडीने कचरा उचलण्याचे काम हाती घेण्यात आले होते. मात्र, आषाढी एकादशीनंतर कमी प्रमाणात पाऊस पडला. यात्रेदरम्यानची भाविकांची संख्या पाहता मोठ्या प्रमाणावर पंढरपूर शहरात संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव वाढत चालला आहे.

पंढरपूर शहरातील सरकारी तसेच खासगी दवाखाने लहान बालकांपासून ते वयोवृध्द नागरिकांनी हाऊसफुल्ल झाले आहेत. घरोघरी एकजण तरी सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी, डोकेदुखीमुळे त्रस्त आहे. त्यामुळे आषाढी यात्रेनंतर पंढरपूरकर नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी होम टू होम आरोग्य यंत्रणा राबवून दिलासा देण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

> **स्वच्छता करण्यात दिरंगाई**
>
> भाविकांची संख्या पाहता अनेक ठिकाणी पडलेला कचरा गोळा करणे, औषध फवारणी करणे, पावडर टाकणे, धुराची फवारणी करण्याचे काम नगरपालिकेने युद्धपातळीवर सुरू केले आहे. मात्र, उपनगरीय भागात कचरा उचलण्यात व स्वच्छता करण्यात दिरंगाई झाली. याचा फटका नागरिकांना बसला आहे.

आषाढी यात्रेनिमित्त पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना सोयी-सुविधा मिळाव्यात, यासाठी राज्य सरकारने मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. या माध्यमातून स्वच्छतेवर भर देण्यात आला. तसेच पार्किंगच्या ठिकाणी चिखल होऊ नये, यासाठी मुरूम टाकणे, शहरात विद्युत रोषणाई, रंगरंगोटी, चौका-चौकात सुशोभीकरण करण्यात आले होते. तसेच भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पालखी मार्गावर आणि पंढरपूर शहरातील गर्दीच्या ठिकाणी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिराचा लाखो भाविकांना लाभ झाला.

आषाढी एकादशीनंतर भाविकांची संख्या घटली असली तरी गुरुवारी गोपाळपूर येथील गोपालकाला झाला. यानंतर शुक्रवारी महाद्वार काल्याने आषाढी वारीची सांगता झाली आहे. मात्र, त्या अगोदरच संसर्गजन्य आजाराशी सामना पंढरपूरकरांना करावा लागत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तत्काळ सरकारी आरोग्य यंत्रणेचा वापर करून होम टू होम आरोग्याची तपासणी करून दिलासा देण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. कोणतीही आरोग्याची समस्या निर्माण झाली नव्हती. मात्र, आषाढी एकादशीनंतर मोठ्या पावसाची गरज होती. मात्र, कमी प्रमाणात पडणाऱ्या पावसामुळे संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव शहरात वाढला आहे.

## पशुधन संकट रोखण्यासाठी तत्काळ कृती करावी

### मिलिंद सरतापे यांची मागणी

**वेळापूर/प्रतिनिधी**

सध्या माळशिरस तालुक्यातील शेतकरी बांधव दुग्ध व्यवसायाला शेतीला जोडधंदा म्हणून स्वीकारत असताना, लंम्पी स्किन डिसीज या महाभयंकर विषाणूजन्य आजारामुळे पशुधनावर गंभीर संकट ओढवले आहे. या परिस्थितीत पशुसंवर्धन विभाग मात्र दुर्लक्ष करत आहे. पशुधन संकट रोखण्यासाठी तत्काळ कृती करावी, अशी मागणी रिपाइंचे माळशिरस तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांनी केली आहे.

लंम्पी स्किन डिसीज ही गोवंशांमध्ये मोठ्या प्रमाणात पसरणारी व प्राणघातक ठरणारी साथ आहे. या आजारामुळे पशुधन दगावण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. तरी माळशिरस तालुक्यात लसीकरणाची मोहीम संथ गतीने सुरू आहे. सर्व गावांमध्ये लसीकरणाचे व्यापक जाळे निर्माण करून प्रत्येक जनावराला लंम्पी प्रतिबंधक लस देणे अत्यावश्यक आहे. जर पशुसंवर्धन विभागाने काही दिवसांत ठोस पावले उचलली नाहीत, तर शेतकऱ्यांचे प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठी तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

## इसमाची विष पिऊन आत्महत्या

**सोलापूर :** वडगाव काटी (ता.तुळजापूर) येथे राहणाऱ्या दत्ता केशव गिरी (वय ४५ ) याने विष पिऊन आत्महत्या केली. मंगळवारी दुपारच्या सुमारास त्याने शेतातील राहत्या घरात पिकावर फवारण्याचे विषारी द्रव प्राशन केले होते. त्याला संतोष (मुलगा) यांनी बेशुद्ध अवस्थेत सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.

उपचारा दरम्यान तो शनिवारी रात्री मयत झाला. या घटनेची प्राथमिक नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## शैक्षणिक दाखले तत्काळ वितरित करण्याची मागणी

**नातेपुते/प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना शैक्षणिक लागणारे दाखले तहसील कार्यालय व प्रांत कार्यालय यांच्याकडून त्वरित वितरित करण्याबाबत अकलूज उपविभागीय कार्यालय प्रांत अधिकारी पांगरकर यांना सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष अक्षय भांड यांनी निवेदन दिले.

यावेळी माळशिरस तालुका राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष अमित देशमुख, कार्याध्यक्ष सागर घाडगे तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या निवेदनामध्ये म्हणण्यात आले आहे की शैक्षणिक कामासाठी लागणारे विद्यार्थ्यांचे प्रलंबित दाखले नॉन क्रिमीलेअर जातीचे दाखले उत्पन्नाचे दाखले शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी विद्यार्थ्यांना कॅप राऊंड तंत्रनिकेतन साठी नॉन कॅप रजिस्ट्रेशन सुरू झाले आहे. अशा अनेक शैक्षणिक प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना दाखल्यांची आवश्यकता भासते.

त्यामुळे तहसील कार्यालय व प्रांत कार्यालय यांच्याकडे विद्यार्थ्यांचे असलेले प्रलंबित दाखले त्वरित वितरित करावे जेणेकरून विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होणार नाही, अशी मागणी सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

## प्रगतीसाठी लोकसंख्या नियंत्रणसासह व्यवस्थापन आवश्यक : प्रा डॉ. येळेगावकर

**सोलापूर/प्रतिनिधी**

भारत लोकसंख्येत जगात पहिला असल्यामुळे व मुठभर लोकांची संपत्ती वाढली म्हणून महासत्ता होत नाही. देशात राहणाऱ्या प्रत्येक माणसाला मुलभूत सुविधा उपलब्ध होत असतील तर आणि त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावला तरच भारत महासत्ता व प्रगत राष्ट्र बनू शकते. कुटुंब नियोजनही जनतेची चळवळ झाली पाहिजे. प्रगतीसाठी लोकसंख्या नियंत्रणसासह व्यवस्थापन आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.




प्रबोधन शिबिराचे उद्घाटन करताना प्रा डॉ.श्रीकांत येळेगावकर, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, प्रा. डॉ. अण्णासाहेब साखरे, प्रा. डॉ. एन. बी. तेली.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व संगमेश्वर कॉलेज स्वायत्त यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित प्रबोधन शिबिरात येळेगावकर बोलत होते. अध्यक्षस्थानी संगमेश्वर कॉलेजचे प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा हे होते.

यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. सुहास पुजारी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. डॉ. अण्णासाहेब साखरे, फॅमली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. एन. बी. तेली यांच्या हस्ते मान्यवरांचा बुके सत्कार करण्यात आला.

डॉ. ऋतुराज बुवा म्हणाले की, येणाऱ्या जनगणनेच्या कार्यक्रमात जनतेचा विशेषतः तरुणांचा सहभाग आवश्यक आहे. कार्यक्रमास प्रा. राजकुमार मोहरकर, प्रा. डॉ. शिवाजी मस्के, प्रा. डॉ. मंजू संगेपांग, प्रा. डॉ. संगीता कामत उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. अण्णासाहेब साखरे यांनी केले. सूत्रसंचालन आमदार गायकवाड यांनी केले तर आभार डॉ. सुहास पुजारी यांनी मानले.

## डीसीसी बँक कर्मचारी पतसंस्थेच्या सभासदांच्या कर्ज रकमेत वाढ

### ५० हजार ते २० लाखांपर्यंत कर्ज मिळणार

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कर्मचारी पतसंस्थेची ९० वी सभा बँकेच्या प्रधान कार्यालयात लोकनेते बाबुराव पाटील सभागृहात संस्थेचे चेअरमन आबासाहेब गुंड यांच्या अध्यक्षतेखाली, सचिव महादेव घोडके यांच्या नियोजनाखाली झाली. यामध्ये सभासदांना नियमित कर्जाची मर्यादा १५ वरून २० लाख रुपये तर तातडीच्या कर्जाची मर्यादा ३० हजारांवरुन ५० हजार रुपये करण्याबाबत चर्चा झाली. लवकरच यावर शिक्कामोर्तब होणार आहे.



पतसंस्थेचे संचालक मिलिंद देशपांडे यांची व्यवस्थापकपदी नियुक्ती झाल्याने प्रमुख मान्यवरांच्या उपस्थित सत्कार करण्यात आला. विषय वाचन सचिव महादेव घोडके यांनी केल. यावेळी व्हाईस चेअरमन अभिमन्यू विजापूरे, संचालक बाळासाहेब पाटील, मिलिंद देशपांडे, राजेंद्र पवार, मृणाल गायकवाड, उमेश गवसने, संतोष वरपे, बाळासाहेब पाटील, अशपाक मुलानी, मधुकर खांडेकर, राजकुमार सरवदे, श्रीरंग सातपुते, शिवशंकर कोरपे, जब्बार देवळे, श्रीमती दुर्गा मासाळ, महादेव घोडके, पदाधिकारी, सभासद, बँक कर्मचारी उपस्थित होते. संचालक राजकुमार सरवदे यांनी आभार मानले.

यावेळी, एखादा कर्जदार सभासद मयत झाल्यास त्याचे किमान १० लाख रुपये माफ करण्याच्या ठरावाला मान्यता देण्यात आली. पतसंस्था मधील कर्मचाऱ्यांना दहा टक्के वेतन वाढ देण्या बाबत चर्चा करण्यात आली.

दुसऱ्या जागेवर कार्यालय बांधण्याचा मार्ग मोकळा पतसंस्थेच्या मालकीच्या दोन जागा आहेत. त्यापैकी एक जागा विक्री करून दुसऱ्या जागेवर पतसंस्थेची इमारत बांधण्यास सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता एक जागा विक्री करून दुसऱ्या जागेवर कार्यालय बांधण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

> “पतसंस्थेचे मागील संचालक मंडळाच्या कालावधीत मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. यामुळे पतसंस्था अडचणीत आली असली तरी विद्यमान संचालक मंडळाने काटकसरीतून पतसंस्थेचा गाडा रुळावर आणला जात आहे. आता आर्थिक स्थिती बरी आहे.
>
> **- आबासाहेब गुंड,** चेअरमन

## विहिरीत उडी घेतलेल्या आनंदचा मृतदेह सापडला

### सोलापुरात झाले अंत्यसंस्कार

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूरच्या आनंद मोहन चितारे याने शुक्रवारी रात्री करमाळा शहरातील सात विहीरीत उडी घेत असल्याचे फोनवरून सांगितल्यानंतर शुक्रवारी रात्रीसह शनिवारी दिवसभराच्या शोधकार्यानंतरही त्याच्या मृतदेहाचा शोध लागला नव्हता. शनिवारी रात्री ते रविवारी सकाळी साडेसहाच्या दरम्यान आनंदचा मृतदेह विहिरीत तरंगत असलेला आढळून आला. यानंतर रविवारी सकाळी सहाय्यक उपनिरीक्षक दादासाहेब वाडगे यांनी घटनास्थळावर जमलेल्या युवकांच्या मदतीने आनंदचा मृतदेह विहिरी बाहेर काढून शवविच्छेदनासाठी करमाळा उपजिल्हा रुग्णालयात पाठवून दिला. मृतदेह बाहेर काढताच आनंदच्या नातेवाईकांनी जोरदार आक्रोश केला. शवविच्छेदनानंतर नातेवाईकांनी



अमोलचा मृतदेह सोलापूर येथे नेण्याचा निर्णय घेतला. यानंतर रविवारी दुपारी आनंदवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेची करमाळा पोलिसांत नोंद झाली असून करमाळा पोलीस पुढील तपास करत आहेत.